REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 6 | MARCH - 2017

# उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमतेचा तुलनात्मक अभ्यास

प्राचार्य. डॉ. झेंडे सुखदेव सिताराम
शिक्षणशास्त्र महाविद्यालय ( बी. एड.), माढा,
तालुका माढा. जिल्हा सोलापूर.

**प्रस्तावना :**

व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासात त्याच्या प्रत्येक विकासावस्थेचे महत्व अनन्यसाधारण आहे. परिपक्वता आणि अनुभव यांच्या परिणामातून घडून येणाऱ्या परिवर्तनाच्या प्रगतीसुचक मालिकेस विकास असे म्हणतात.

प्रत्येक विकासावस्थ्ेमध्ये व्यक्तीमध्ये विविध प्रकारचे बदल घडून येत असतात. मात्र ज्या कालखंडात विकास प्रक्रियेला गती मिळून अनेक बदल घडतात. त्या बदलाची जाणीव संबंधीतांना तीव्रपणे होते. तो कालखंड म्हणजे कुमारावस्था होय. ज्याला इंग्रजीमध्ये टीन एजर्स असे संबोधले जाते. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी हे कुमरवस्थ्ेतीलच असतात. त्यांच्या भावनांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.



थोडक्यत विद्यार्थ्यांना स्वत:च्या व इतरांच्या भावना ओळखणे , भावनांची देखरेख करणे, त्यांचे नियमन व नियंत्रण करणेसाठी सक्षम बनविणे तसेच आपले विचार व कृती यांना मार्गदर्शन करण्यासाठी भावनाचा उपयोग करण्यास शिकवणे तसेच सभोवतालची परिस्थिती व समस्यांशी स्वत:च्या व इतरांच्या नातेसंबंधात जुळवून घेण्याच्या प्रभावी आंतरक्रिया करण्यासाठी उपयोगाचे भान असण्याची क्षमता म्हणजे भावनिक बुद्धिमता होय. खरेतर भावनिक बुद्धिमत्ता म्हणजे हृदय व मस्तक यांचे सुयोग्य मिश्रण होय.

**भावनिक बुद्धिमतेची चार क्षेत्रे खालील प्रमाणे :**

१. भावनांची ओळख - स्वत:च्या व इतरांच्या भावना ओळखणे
२. भावनांची ग्राह्यक्षमता ( एकात्मिकरण) विचार प्रक्रियेत भावनांचे उपयोजन करणे.
३. भावनांचे आकलन : स्वत:चे विचार व वर्तन आणि भावना यामधील परस्पर संबंधीचे अचुक आकलन करण्याची समजण्याची क्षमता.
४. भावनांचे व्यवस्थापन : भावनांचे नियमन व नियंत्रणाची क्षमता याद्वारे ध्येयावर लक्ष केंद्रित करुन त्यानुसार योग्य वर्तन करणे व अयोग्य वर्तनला स्वयं-सुचनेमार्फत नियंत्रण करणे म्हणजे भावनांचे व्यवस्थापन करणे.

शाळेच्या शिस्तप्रिय बंदिस्त वातावरणातून कुमार खुल्या व मोकळया वातावरणात असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतो. कौमार्यावस्थ्ेत झपाटयाने होणारे शारिरीक बदल कॉलेजजीवनाचे आकर्षण त्याचवेळी पुढील आयुष्यात नेमके काय करायचे? काय व्हायचे ? आपल्याला कोणत्या जबाबदाऱ्या भावी काळात पेलायच्या आहेत यामुळे कुमार गोंधळून गेलेले असतात. त्यामुळे भावना ओळखण्यास, समजण्यास, नियंत्रण करण्यास, व्यक्त करण्यास, तसेच त्याचा व्यक्तीगत व सामाजिक विकास करण्यास भावनिक बुद्धिमत्तेला कसे महत्व आहे. याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला आहे.

**गरज आणि महत्व :**

आज कोणतेही वर्तमानपत्राचे वाचन करीत असतांना त्यामध्ये अस्थिर भावनिक विश्व समोर येते. मग त्या दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना आत्महत्येच्या स्वरुपात असतील किंवा प्रेमभंग त्यातील निराशा किंवा प्रेमभंगामुळे होणारे दुर्देवी प्रकार असतील.

आजच्या कुमाराला आपल्या भावनांचे व्यवस्थापन समजले पाहिजे. त्याच प्रमाणे आपल्या तसेच इतरांच्या भावनांची जाणीव त्यांना झाल्यास व त्याचे योग्य व्यवस्थापन त्यांना करता आल्यास त्यांच्यात आत्मविश्वास वाढीस लागेल. जो त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात महत्वपुर्ण असेलच मात्र वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात ही मौलिक असेल.

आजच्या काळात ज्यांची भावनिक बुद्धिमत्ता चांगली आहे. त्यांच्या हाती यशाची किल्ली आहे. असे म्हणावे लागेल. कारण योग्य वेळी योग्य भावनांचे योग्य प्रगटीकरण व्यक्तीला यशाच्या शिखरावर पाठवितात. असा अनुभव आहे.

**समस्या विधान :** उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता पातळीचा तुलनात्मक फरक अभ्यासणे.

२. **संशोधनाची परिकल्पना :** उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता उच्च पातळीची असते.

**संशोधनाची शुन्य परिकल्पना** : उच्च माध्यमिक स्तरावरील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमतेच्या पातळीत फरक नाही.

**संशोधन पद्धती :** सदरील अभ्यास हा सर्वेक्षण पद्धतीने पूर्ण केला.

**संशोधन नमुना :** नमुन्यामध्ये औरंगाबाद शहरातील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधून १०० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड केली. त्यामध्ये ५० कला शाखा व ५० विज्ञान शाखांचे विद्यार्थी आहेत.

**संशोधनाची साधने** : सदरील अभ्यासाच्या माहिती संकलनासाठी भावनिक बुद्धिमत्ता शोधिका एस.के.मंगल यांची चाचणीचा वापर केला.

**माहिती संकलन विश्लेषण व अर्थनिर्वचन :** संकलीत माहितीचे ही परिक्षीका तालीकीकरण करुन मध्यमान, प्रमाण विचलन व यांच्या साह्याने संकलीत माहितीचे विश्लेषण केले.

**परिकल्पना क्रमांक १.** उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता उच्च पातळीची आहे.

**विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता पातळी बाबत.**

| नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | विस्तार |
|---|---|---|---|
| ५० | ७१.४२ | १०.९५ | ७१-७५ |

तक्ता क्रमांक १ मध्ये उच्च माध्यमिक स्तरावरील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता संख्याशास्त्रातील मध्यमान, प्रमाण विचलनाद्वारे काढला आहे.

उच्च माध्यमिक स्तरावरील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मिळालेल्या प्राप्तांकानूसार मध्यमान हे ७१.४२ आले तर प्रमाण विचलन १०.९५ आहे. मध्यमान हे विस्तार ७१-७५ या दरम्यान येते.

म्हणून विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्तेची पातळी चांगली दिसून येते.

**तक्ता क्रमांक २ : कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता पातळीबाबत**

| नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | विस्तार |
|---|---|---|---|
| ५० | ७४.२ | ९.४७ | ७१-७५ |

तक्ता क्रमांक २ मध्ये असे दिसून येते की, उच्च माध्यमिक स्तरावरील कला शाखेतील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता संख्याशास्त्रीय प्रणालीद्वारे काढली आहे.

उच्च माध्यमिक स्तरावरील कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या मिळालेल्या प्राप्तांकानूसार मध्यमान ७१-७५ च्या दरम्यन येते.

**म्हणून कला शाखेतील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता पातळीचा तुलनात्मक अभ्यास .**

| विद्यार्थी | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मुल्य | टेबल मुल्य | सार्थकता मध्यमानातील फरक हा सार्थक आहे |
|---|---|---|---|---|---|
| विज्ञान शाखा | ७१.४२ | १०.९५ | | | मध्यमानातील फरक सार्थक आहे |
| कला शाखा | ७४.२ | ९.४७ | ३.६१ | १.९८ | |

तक्ता क्र. ३ नुसार असे निदर्शनास येते की, विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ताचे T मुल्य ३.६१ हे ( सार्थकता स्तर .०५ या स्तरावर) टेबल मुल्य १.९८ पेक्षा अधिक आहे. म्हणून माध्यमातील फरक हा सार्थक आहे.

यावरुन उच्च माध्यमिक स्तरावरील विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता पातळीमध्ये सार्थक फरक असल्याचे दिसून येते.

याचा अर्थ उच्च माध्यमिक स्तरावरील विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेत लक्षणिय फरक दिसून येतो.

## निष्कर्ष :

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता पातळी चांगली आहे.

२. उच्च माध्यमिक स्तरावरील कला शाखेतील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता विज्ञान शाखेतील भावनिक बुद्धिमत्तेपेक्षा चांगली दिसून आली.

## शिफारशी :

उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता पातळीमध्ये सकारात्मक बदल होण्यासाठी कॉलेजमध्ये कार्यशाळा उदबोधन वर्ग, मार्गदर्शन, समुपदेशन, कार्यशाळांचे आयोजन करावे.

## संदर्भग्रंथ :

१. बेस्ट जे.डब्ल्यु (१९९५) रिसर्च इन एज्युकेशन (७ वी आवृत्ती) नवी दिल्ली, प्रेन्टीस हॉल ऑफ इंडीया प्रायव्हेट लिमिटेड.

२. गोलमन डी. (१९९५) भावनिक बुद्धिमत्ता (पहिली आवृत्ती) न्युयॉर्क, बॅन्टम बुक्स.

३. Asthana Bipin (२००५) Measurment and Evalution in psychology and Education Ed.८, Agra: Vinod pustak Mandir.